
ज्ञान प्रबोधिनी प्रशाला ५१

# 51@51

आम्ही ५१!





## गोष्ट क्र.२७

वादळी चर्चा हे आमच्या संजीवनच्या कोअर ग्रुपचं खास वैशिष्ट्य असे. एका अशाच वादळी चर्चेमध्ये भाईंनी केलेलं एक विधान आजही मला स्मरतं. ते म्हणाले होते – 'आपण तत्त्वनिष्ठ आहोत असा खूप जणांचा दावा असतो. पण एखाद्या तत्त्वाशी आपण एकनिष्ठ आहोत हे कसं सिद्ध होणार? ते सिद्ध करण्याचा एकमेव मार्ग म्हणजे त्या तत्त्वासाठी आपण किती मोठी किंमत चुकती करू शकतो हाच असतो. केवळ व्यावहारिक, आर्थिक किंवा इतर कुठल्याही कारणांसाठी जर तत्त्वांबाबत तडजोड करणार असू, तर आपण तत्त्वनिष्ठेचा दावा करू शकणार नाही.' भाईंच्या या विधानानं मी अगदी आतून बाहेरून हादरलो होतो. तो धक्का आजही कायम आहे. हा कठोर आणि खराखुरा निकष लावायचा तर आपण अगदीच तत्त्वशून्य आहोत असं वाटावं.

** या वेळची गोष्ट थोडी वेगळी आहे. आपल्याच एका दिवंगत मित्राबद्दल काही मित्रांनी लिहिलेली.*

कै. विवेकानंद (भाई) फडके
(१९७३ ची तुकडी)

**स्मृतीतून स्फुरो कृती**

५१ @ ५१ या लेखमालेमध्ये कै. विवेकानंद (भाई) फडके यांच्या जीवनप्रवासाबद्दल लिहिताना त्यांच्या नावाच्या मागे दिवंगत (कै.) हे असणे हे अति दुःखद आहे. त्यांच्यासारख्या उमद्या कार्यकर्त्याला आयुष्याच्या मध्यंतरवर्षातच मृत्यू यावा, हे अकल्पनीयच होते. वयाच्या ५७व्या वर्षी झालेले त्यांचे निधन अकालीच म्हणावे लागेल. त्यांचा जन्मदिन (१७ जून १९५६) आणि मृत्यूदिन (७ जुलै २०१३) याच्यामध्ये आपण त्यांचे स्मरण करून ही गोष्ट घेत आहोत. त्यांच्या अल्प आयुष्यात त्यांनी प्राध्यापक, संशोधक, संघटक, विद्यार्थी मार्गदर्शक (अधिमित्र), सामाजिक कार्यकर्ता, प्रशासक अशा विविधांगी भूमिका सहजतेने व समर्थतेने पेलल्या.

**'असू अम्ही सुखाने पत्थर पायातील'**




बुद्धिमान मुलांना निवडून त्यांच्या सर्वांगीण विकासाचे उपक्रम करणाऱ्या पुण्याच्या ज्ञान प्रबोधिनीत वयाच्या चौदाव्या वर्षी भाईंना प्रवेश मिळाला. शालेय व महाविद्यालयीन शिक्षणाच्या काळात ज्ञान प्रबोधिनीच्या माध्यमातून महाराष्ट्रातील युवकांचे क्रीडा उपक्रम व त्यातून युवक संघटन; देशप्रश्नांचा अभ्यास करण्यासाठी बिहारमधील जयप्रकाश नारायण आंदोलन-अभ्यासदौरा असे अनेक अभ्यासदौरे; सह्याद्रीच्या गडांवरील व दऱ्याखोऱ्यातील साहस व श्रमसहली; गणेशोत्सवातील बरची-ढोल-ताशा व ध्वजपथके; साम्यवाद-समाजवाद-गांधीवाद-हिंदुत्व अशा विविध विचारधारांच्या अभ्यासाची अभ्यासशिबिरे; भूकंप-दुष्काळ-पूर अशा आपत्ती प्रसंगी केलेली मदतकार्ये अशा असंख्य उपक्रमांमध्ये भाईंनी झोकून देऊन काम केले.

इंग्लिश साहित्यात पदवी प्राप्त केल्यावर भाईंनी ज्ञान प्रबोधिनीत दहा वर्षांहून अधिक काळ शिक्षण, युवक संघटन, व्यापार-उद्योग, ग्राम विकसन, मेडिकल ट्रस्ट अशा विविध क्षेत्रात तृतीय प्रतिज्ञित कार्यकर्ता म्हणून काम केले. उद्योग जगतातील काहीही अनुभव पाठीशी नसताना वयाच्या अवघ्या २१व्या वर्षी, पदवीनंतर, ज्ञान प्रबोधिनीच्या कपॅसिटर मॅन्युफॅक्चरींग डिव्हिजनाठी हरियाणा इलेक्ट्रिसिटी बोर्डाची १५ लाखांची (१९७७ सालचे) ऑर्डर भाईंनी भगीरथ प्रयत्नांनी मिळवून आणली. त्यासाठी हरियाणा बोर्डाचे चेअरमन श्री. बन्सल यांना 'ज्ञान प्रबोधिनीचे शैक्षणिक व सामाजिक काम आर्थिकदृष्ट्या स्वावलंबी व्हावे यासाठी ज्ञान प्रबोधिनीतर्फे उद्योग कसे चालवले जातात' याविषयी माहिती दिली व त्यांना पुण्यात आणून ज्ञान प्रबोधिनीच्या कामाचे दर्शन घडविले.

प्रबोधिनीच्या संशोधन विभागाचे पुणे विद्यापीठ वा UGC संबंधातील काम असो वा ग्रामीण न्यासाला आयकर विभागाची सेक्शन 35AC द्वारे देणग्यांमध्ये सवलत मिळविण्यासाठी दिल्लीच्या मंत्रालयात North Block मध्ये अनेक खेटे मारण्याचे काम असो भाईंनी अत्यंत चिकाटीने अशा कामांचा पाठपुरावा करून ती कामे तडीस नेली.



Participation in 22 conferences
& 4 refreshment courses

ज्ञान प्रबोधिनीतील कार्याबरोबरीने डोंबिवलीतील पेंढारकर महाविद्यालयात १९८६ ते १९९२ या काळात आणि पुण्यातील फर्ग्युसन महाविद्यालयात १९९३ ते २०१३ या काळात पदवीपूर्व व पदव्युत्तर वर्गांसाठी इंग्लिशचे अध्यापन केले. टिळक महाराष्ट्र विद्यापीठात ते पीएच्.डी. चे गाईड होते. त्यांचा पीएच्.डी. चा ग्रंथ, असंख्य संशोधन निबंध, डॉक्युमेंटरीज, साहित्य परिषदांमधील व आकाशवाणीवरील भाषणे यातून त्यांचे इंग्लिश साहित्यावरील प्रभुत्व दिसते व त्यामुळेच त्यांना या क्षेत्रात आदराचे स्थान होते.

ते नुसते विद्वान नव्हते तर त्यांचे विद्यार्थ्यांशी अत्यंत जिव्हाळ्याचे मैत्रीपूर्ण संबंध होते. नागालँड वा इराण वा जगाच्या पाठीवरील कोणत्याही देशातून फर्ग्युसनमध्ये आलेला विद्यार्थी असो त्याला फडके सरांचे प्रेम मिळायचे व त्याला घरापासून आपण लांब आलो आहोत असे कधीच वाटायचे नाही. ते फक्त इंग्लिश शिकविणारे प्राध्यापक नव्हते तर विद्यार्थ्यांचे अत्यंत प्रिय Friend-Philosopher-Guide होते असे त्यांचे विद्यार्थी सांगतात.



With faculty members and students of Department of English, Fergusson College


With members of Gymkhana


With few of his foreign students

फर्ग्युसनचे उपप्राचार्य, जिमखाना मॅनेजिंग कमिटीचे चेअरमन, ग्रंथालय समितीचे चेअरमन अशा विविध पदांवर केलेले काम त्यांच्या उत्तम प्रशासनाची चुणूक दाखवतात. फर्ग्युसनच्या ग्रंथालयातील पावणेदोन लाख पुस्तकांच्या नोंदींच्या संगणकीकरणाचे काम असो, किंवा शैक्षणिक वर्षाच्या सुरुवातीला सर्व वर्गातील बाके, ट्यूबलाईट, पंखे व्यवस्थित आहेत की नाही हे जातीने तपासणे असो या व अशासारख्या सर्व प्रकारच्या प्रशासकीय कामातील फडके सरांचा पद्धतशीरपणा, पारदर्शकता, शिस्त वाखाणण्याजोगी होती. एकाच वेळेला इंग्लिश साहित्यातील विद्वत्ता, कामातील शिस्त व तत्परता आणि विद्यार्थी व सहकार्यांमधील लोकप्रियता अशा गुणांचा दुर्मिळ संयोग त्यांच्यात झाला होता असे त्यांचे फर्ग्युसनमधील सहकारी प्रा. नलावडे आवर्जून सांगतात.

पुण्यातील 'कलासक्त' हा कलाक्षेत्रातील गट आणि जगातील विविध भाषांमधील निवडक वाङ्मय मराठीत प्रसिद्ध करणारे नियतकालिक 'केल्याने भाषांतर' या दोन्ही संस्थांच्या स्थापनेत भाईंचा सहभाग होता. भाषांतरकारांचे संमेलन व व्याख्याने तसेच संस्थेच्या हिशेबांचे ऑडिट व धर्मादाय आयुक्तांच्या कार्यालयातील कामे ते न कंटाळता करीत असत, असे 'केल्याने भाषांतर' मधल्या त्यांच्या सहकारी प्रा. सुनंदा महाजन आग्रहपूर्वक नमूद करतात. दुसऱ्याने कामात चुका केल्या तरी त्या शांतपणे सहन करून सहकार्यांकडून व्यवस्थितपणे कामे करवून घेण्यात त्यांचा हातखंडा होता.

मी व भाई आम्ही दोघेही प्रबोधिनीचे विद्यार्थी व कार्यकर्ते असल्याने आमचा ३५ वर्षांपासूनचा संबंध होता. आम्ही सर्व मित्रांनी एकत्र येऊन २००९ साली 'मित्र' (Mission for Transformation of Rurban Area) ही स्वयंसेवी संस्था स्थापन केली. 'भारतातील छोट्या व मध्यम आकाराच्या शहरांची अर्थव्यवस्था व पायाभूत सोयी भक्कम करून भारताच्या विकासाला गती देता येऊ शकेल' हा विचार पायाभूत ठेवून 'मित्र' संस्था या क्षेत्रात विविध उपक्रम व संशोधन करीत आहे. भाई या संस्थेचे संस्थापक-अध्यक्ष होते. शेवटच्या वर्षातील गंभीर आजारपणातसुद्धा भाई 'मित्र'च्या बैठकींना नियमित येत असत व सर्व चर्चांमध्ये हिरीरीने भाग घेत असत.

भाईंच्या कुटुंबाच्या व नातेवाईकांच्या विस्तारित परिवारात आणि त्यांच्या संबंधात येणाऱ्या लहान-मोठ्या सर्वांनाच भाई दीपस्तंभासारखे भासत. 'लहानपणी विवेकानंद द्वाड व दंगेखोर होता' असे त्यांच्या आई सांगत. पण या द्वाड विवेकानंदाचे मोठेपणी संयमी, संतुलित, तर्कशुद्ध विचार करणारे, गंभीर, अंतर्मुख, जिंदादिल भाईमध्ये रूपांतर झाले.





**कुटुंबियांसमवेत भाई**

### भाई – हाडाचा संघटक

त्यांच्या अष्टपैलू व्यक्तिमत्त्वाबद्दल अनंतराव अभंग यांनी लिहिले आहेच. त्या आठवणीत काही भर घालावी, म्हणून हा छोटा लेख.

भाईची ओळख मी प्रशालेत इ. ६वीत प्रवेश घेतला त्याचवर्षी झाली. कारण 'रामदास' पथकाचा तो पथकप्रमुख होता. त्याच पथकात मीही होतो. ही ओळख व मैत्री नंतर ४० वर्षे टिकली-वाढली. अनेक संस्मरणीय प्रसंग भाईबरोबर मी, आमच्या वर्गाने व प्रबोधिनीतील अनेक कार्यकर्त्यांनी अनुभवले. इ. ११वी संपताना आमच्या वर्गाची सहल भोर-डिंडोशी-क्षेत्र महाबळेश्वर-प्रतापगड अशी भाईने योजली. क्षेत्र महाबळेश्वराच्या कोकणकड्यावरून उतरताना पायी वाट भरगच्च धुक्यात हरवली तेव्हा एकमेकांच्या रकसॅकला घट्ट धरून उभ्या सरळसोट कड्यापाशी येऊन आम्ही थबकलो तेव्हा भाईच आघाडीवर

होता! त्याच सहलीत कृष्णा नदीच्या वरच्या बाजूला नदी पार करताना एक मित्र पाण्याच्या प्रवाहात जवळपास वाहूनच चालला होता, त्याला हात देऊन काठापर्यंत पोचविणारा भाईच होता. 'भाई' हे नावही त्यावेळच्या प्रबोधिनीत व युवक विभागातही नवे होते कारण सर्वांचेच 'राव' हे नामकरण महाविद्यालयात गेल्यानंतर आपसूकच व्हायचे. त्याला अपवाद म्हणून का 'भाई' हे नाव, जरा रुळायला वेळच लागला पण भाई नावाने होणारी जवळीक व विशेष आत्मीयता अनेकांना अजूनही लक्षात आहे.

युवक विभागाच्या प्रवासात १९७५-७६च्या वर्षी भाई व प्रफुल्ल कुलकर्णी बिहारमध्ये जाऊन जयप्रकाश नारायण यांच्या आंदोलनाचा अभ्यास करून आले. युवकांच्या महाराष्ट्रभराच्या विस्तार शिबिरात यवतमाळ येथील शिबिर त्याने घेतले, त्यावेळेस चंद्रपूर येथे मी गेलो होतो. ऐन उन्हाळ्यात ४५ अंश तापमानात ही शिबिरे झाली, युवकांचे काम पहिल्यांदाच महाराष्ट्रात विस्तारले. मोरवी पूरग्रस्त मदतकार्यात भाईबरोबर मीही होतो. आंध्र वादळानंतर दीर्घकाळ चाललेल्या मदतकार्यात पुण्यातील किर्लोस्कर कमिन्समधील सुमारे पंधरा कर्मचारी सदस्य सहभागी होते. भाईने त्या गटाचे नेतृत्व केले. अवनीगड्डा परिसरात प्रबोधिनीच्या या गटाने काम केले. व्यापार-उद्योग विभागाच्या कामानिमित्ताने प्रबोधिनीचे दिल्लीत पहिल्यांदा प्रतिनिधित्व करण्याचा मानही भाईचा. युवक विभागाच्या फटाकेविक्रीच्या निमित्ताने २५०-३०० जड पेट्या ट्रकमधून उतरवून घेऊन वास्तूत दोन मजले जिन्याने चढविण्याचे काम भाईच्या बरोबर मी व अनेक युवकांनी केले. या सर्व श्रमांचा परिहार व्हायचा तो बटाटेवडे खाऊन! ऐन पावसाळ्यात भिजून, चिखलात दमून-माखून वास्तूत परतल्यानंतर युवक कार्यकर्त्यांचा छोटा गट गप्पांना एकत्र बसायचा तो वडा-पावच्या सोबतीने. (आजही नवी पेठ, विठ्ठल मंदिरासमोर ती वडा-पावची हातगाडी आहे, आम्ही खूप पूर्वी त्याचे संस्थापक-ग्राहक होतो!) याच गटाला विनोदाने भजी महामंडळ असेही नाव पडले. अर्थातच वडे खाणे हे निमित्त होते, त्यानिमित्ताने होणाऱ्या गप्पा-चर्चा व युवकसंघटन हा भाईचा जिव्हाळ्याचा विषय होता. प्रबोधिनीत युवक विभागात, नंतर अनेक वर्षे फर्ग्युसन महाविद्यालयात प्राध्यापक म्हणून शिकविताना वयाने १५-२० वर्षे लहान असणाऱ्या युवकांना जोडण्याची त्याची हातोटी म्हणजे खरंतर सहजस्वभावच होता.



**मा. आप्पांची दलाला संचालक भेट**



**भजी महामंडळ**

संजीवन-दीनानाथच्या यशस्वी संघटन प्रयोगाबद्दल लिहिताना भाईच्या एका न साकारलेल्या स्वप्नाबद्दलही लिहिले पाहिजे. प्रबोधिनीच्या माजी विद्यार्थ्यांनी एकत्र येऊन एक मोठी बँक स्थापन करावी, असे त्याला आवर्जून वाटत होते. साधारण डॉक्टरांचा गट एकत्र जमण्याच्या आजूबाजूच्या वर्षातील ही कल्पना होती. त्यामुळे Commerce, अर्थशास्त्र, Company Secretary, management या विषयात पदवी-पदव्युत्तर शिक्षण पूर्ण केलेले अशा आठ-दहा जणांची बैठकही काही दिवस झाल्याचे आठवते. काही कारणाने ती कल्पना फार पुढे गेली नाही, गटाचीही पांगापांग झाली. आज विचार करताना असे लक्षात येते की खरंच त्या प्रकल्पाचेही स्वप्न साकार झाले असते तर कदाचित दीनानाथ रुग्णालयासारखी आर्थिक क्षेत्रात काम करणारी प्रबोधिनीच्या माजी विद्यार्थ्यांची मोठी संस्था उभी राहिली असती. मोहनराव गुजराथी व त्यांचे प्रबोध उद्योगातील सहकारी यांनी काही प्रमाणात त्याच दिशेने प्रयत्न केला. अरविंद परांजपे व त्यांच्यासारखे अनेक विद्यार्थी-विद्यार्थिनी आर्थिक क्षेत्रात काम करत आहेत.

आयुष्याच्या वेगवान प्रवासात जर-तरला तसा अर्थ नाही. त्यामुळे आज भाई असता तर... असा विचार केवळ त्याच्या गुणांच्या आठवणींत रमणे होईल. तशा असंख्य आठवणी आहेत - माझ्या व इतर अनेकांच्या. गणेशोत्सवात देखणा ध्वज नाचविणारा भाई, चाफेकर बंधूंच्या जीवनात एका चाफेकर बंधूची भूमिका वठविणारा भाई, फर्ग्युसन महाविद्यालयात शिकवून झाल्यानंतर संध्याकाळी प्रबोधिनीत युवक विभागात अनेक युवकांशी मैत्र जोडणारा भाई, प्रबोधिनीच्या वास्तू बांधकामात एका रात्री बांधकाम चालू असताना रात्री तिसऱ्या मजल्यावरून एक बांधकाम मजूर खाली पडला होता व त्याला शस्त्रक्रियेनंतर तातडीने रक्त देण्याची आवश्यकता होती, ससूनला जायचे आहे म्हणून आम्हा चार-पाच युवकांना रक्तदानासाठी साद देणारा भाई ..... अशा अनेक आठवणींचा पट डोळ्यासमोर आहे. प्रशालेच्या ५१-५२व्या वर्षात तो आपल्यामध्ये नाही पण अनेकांच्या आठवणींमध्ये आहे. त्या आठवणींचे स्मरण करून त्याला ही सर्व मित्रांच्या वतीने आदरांजली.

## Medicine is the right arm of Gospel

आप्पा नेहमी म्हणायचे, 'Medicine is the right arm of Gospel' यासाठी प्रबोधिनीने वैद्यकीय सेवा-क्षेत्रात काम केले पाहिजे. यातून प्रेरणा घेऊन भाईंनी प्रबोधिनीच्या माजी विद्यार्थ्यांमधील तरुण डॉक्टरांना एकत्र आणले व ज्ञान प्रबोधिनी मेडिकल ट्रस्टची स्थापना केली. डॉक्टरांच्या या गटाने पहिली दहा वर्षे संजीवन रुग्णालय व नंतर दीनानाथ मंगेशकर रुग्णालय यांचे समर्थपणे व्यवस्थापन करून वैद्यकीय सेवाक्षेत्रात मोलाची कामगिरी केली व अजूनही करीत आहेत. संजीवन व दीनानाथ या दोन्ही रुग्णालयांच्या कामकाजात आदर्शवाद व व्यवहार यांचा आग्रह भाईंनी वेळोवेळी धरला. जे चूक वाटते ते सांगायला न घाबरणारे असे भाईंचे नीडर व्यक्तिमत्त्व होते. सामाजिक कामासाठी तरुणांचे गट उभे करताना स्वतःकडे दुय्यम भूमिका घेण्यात त्यांनी कधीच कमीपणा मानला नाही. युवकांच्या संघटनाचे अत्यंत मोलाचे काम पण पडद्याआड राहून करण्याचाच त्यांचा पिंड होता. व्यवस्थापनशास्त्राच्या संशोधनानुसार कोणत्याही व्यावसायिक वा सामाजिक संघटनेत अशा प्रकारच्या व्यक्ती फक्त १०% च असतात व त्याच संघटनेचा खरा आधार असतात.



**आ. अटलजी बाजपेयी यांच्या हस्ते संजीवन रुग्णालयाचे उद्घाटन**

**संजीवन रुग्णालयच्या पदाधिकारी डॉक्टरांसमवेत**



एका प्रदीर्घ प्रयत्नानंतर प्रबोधिनीतील माजी विद्यार्थ्यांचा डॉक्टरांचा एक गट संजीवन रुग्णालय चालविण्याच्या पूर्वतयारीत असताना या गटाला अदृष्यपणे बळकटी देण्याचे-बांधण्याचे काम शांतपणे अनेक वर्षे भाईने केले. याच गटाला प्रशालेव्यतिरिक्त अन्यही तज्ज्ञ घेऊन तो जोडत राहिला. त्यामध्ये (निवृत्त) कर्नल जयसिंह पेंडसे व डॉ. श्रीराम गीत यांच्यासारखे ज्येष्ठ सदस्य तर होतेच पण शिरीष जोशी, डॉ. संजीव मंगळूरकर, डॉ. पराग माणकीकर, डॉ. रमाकांत हिंगे, डॉ. राजेन्द्र देशमुख यासारखे विविध क्षेत्रातील तज्ज्ञही होते. व्यक्ती तितक्या प्रकृती, भिन्न स्वभाव, विविध विद्याशाखांमधील विशेष शिक्षण व अनुभवविश्वातील पराकोटीचे वैविध्य व त्यामुळे प्रत्येकाच्याच स्वभावाला आलेले धारदार कंगोरे, या सर्व गटाला एकत्रितपणे वाटचालीसाठीचे आवश्यक ते मैत्र-ध्येय वंगण भाईच्या संघटन वृत्तीमुळे मिळत राहिले. केवळ मैत्रीसाठी किंवा निव्वळ ध्येयप्रेरणा या एका चाकावर या संघटनाची गाडी दीर्घकाळ चालली नसती. कालांतराने संजीवन रुग्णालय, त्याचा विस्तार, त्यातून दीनानाथ रुग्णालयाची उभारणी व वेगाने वाढ या प्रवासात भाईने व अजून काही जणांनी थांबायचे ठरवले पण सुरुवातीची सात-आठ वर्षे व त्यात मिळालेला भक्कम पाया दीर्घकालावधीसाठी उपयोगी पडला.

वादळी चर्चा हे आमच्या संजीवनच्या कोअर ग्रुपचं खास वैशिष्ट्य असे. एका अशाच वादळी चर्चेमध्ये भाईंनी केलेलं एक विधान आजही मला स्मरतं. ते म्हणाले होते - 'आपण तत्त्वनिष्ठ आहोत असा खूप जणांचा दावा असतो. पण एखाद्या तत्त्वाशी आपण एकनिष्ठ आहोत हे कसं सिद्ध होणार? ते सिद्ध करण्याचा एकमेव मार्ग म्हणजे त्या तत्त्वासाठी आपण किती मोठी किंमत चुकती करू शकतो हाच असतो. केवळ व्यावहारिक, आर्थिक किंवा इतर कुठल्याही कारणांसाठी जर तत्त्वांबाबत तडजोड करणार असू, तर आपण तत्त्वनिष्ठेचा दावा करू शकणार नाही.' भाईंच्या या विधानानं मी अगदी आतून बाहेरून हादरलो होतो. तो धक्का आजही कायम आहे. हा कठोर आणि खराखुरा निकष लावायचा तर आपण अगदीच तत्त्वशून्य आहोत असं वाटावं.

**- डॉ. संजीव मंगरुळकर**



१९८३ ते १९८६ :
संचालक कार्यालय प्रमुख म्हणून कार्यरत



आसामी विद्यार्थिनींबरोबर



मार्गदर्शक भाई





निवांत भटकंती

संपर्क क्रमांक –

१. स्मिताताई फाटक – फडके – ९८९२०९३७०२

२. तेजनताई पळसुले – ९८२२५००५५४

३. मीनलताई नरवणे – ९८२३३३८२४७

लेखन – अनंत अभंग आणि अजित कानिटकर

संपादन – मानसी बोडस, पल्लवी गोखले – नगरकर

सर्व छायाचित्रे कै. भाई फडके यांच्या कुटुंबियांच्या सौजन्याने

Write to us : jpp51_51@jnanaprabodhini.org

सोबत : 'ज्ञान प्रबोधिनी एक अभिनव शैक्षणिक प्रयोग– खंड चार – भाग एक' यामधील जेपीएम्टी आणि संजीवन यांच्या स्थापनेच्या काळातील आठवणींना उजाळा देणारा श्रीमती स्वाती केळकर यांचा 'संघटना हे सूत्र बनावे' हा लेख

# संघटना हे सूत्र बनावे

**- श्रीमती स्वाती केळकर**

'ज्ञान प्रबोधिनी प्रशालेच्या, वैद्यकीय क्षेत्रात असलेल्या काही माजी विद्यार्थ्यांनी एकत्र येऊन ज्ञान प्रबोधिनी मेडिकल ट्रस्ट स्थापन केला आणि संजीवन रुग्णालय चालवायला घेतलं,' ही एका वाक्यात सांगितलेली गोष्ट ऐकायला वाटते तेवढी साधी आणि सोपी नाही. मागे वळून बघितलं तर लक्षात येतं, की याची मुळं खूप खोलपर्यंत गेली आहेत.

सुरुवात, खरं तर फार पूर्वीच झाली होती. लातूरला विवेकानंद रुग्णालय झालं, तेव्हाच कै. आप्पांची इच्छा होती, की ज्ञान प्रबोधिनीच्या विद्यार्थ्यांनी पुण्यातही असंच एक रुग्णालय सुरू करावं. नंतर भाई फडके यांनी यासाठी बरेच प्रयत्न केले. ज्ञान प्रबोधिनीच्या मेडिकल कॉलेजमध्ये शिकणाऱ्या काही माजी विद्यार्थ्यांना भाई दर महिन्याला एकत्र जेवायला घेऊन जात असत. उद्देश हा की हे सर्व भावी डॉक्टर्स एकदुसऱ्याच्या संपर्कात राहावेत आणि पुढे त्यांनीच रुग्णालय उभारणीचं काम करावं. पण नंतर हे सगळेच वेगवेगळ्या दिशांना गेले.

मुंबईच्या टाटा रुग्णालयात कर्करोगासंबंधी शिक्षण संपवून १९९० मध्ये डॉ. धनंजय केळकर पुण्याला आले आणि इथेच मेडिकल प्रॅक्टिस सुरू केली. पुण्यात आणि पुण्याच्या जवळपासच्या बऱ्याच लहान-मोठ्या रुग्णालयांत ते कॅन्सरच्या शस्त्रक्रिया करायचे. पेशंटशी त्यांचा संबंध फक्त शस्त्रक्रियेपुरताच असायचा. नंतर परत पेशंट भेटायचाही नाही. रुग्णालय चालकांना तेच सोयीचं होतं. डॉक्टरांना हे काही पटत नव्हतं. वैद्यकीय क्षेत्रात वाढत चाललेल्या अप्रामाणिकपणामुळे पण ते फार अस्वस्थ झाले होते. बऱ्याच लोकांशी चर्चा करून काही निष्पन्न झालं नाही. वैद्यकीय क्षेत्रात बरीच वर्षं स्थिरावलेल्या प्रतिष्ठित डॉक्टरांचंसुद्धा हेच मत होतं की हा प्रवाह आहे आणि त्यात वाहात जाण्याशिवाय इथं जगण्याचा दुसरा पर्याय नाही. डॉ. केळकरांना हे पटत नव्हतं. त्यांची गिरीशरावांशी या विषयावर चर्चा झाली. काही संस्थात्मक काम करणं शक्य आहे का असाही विचार झाला.

१९९२ मध्ये ज्ञान प्रबोधिनीत झालेला माजी विद्यार्थी मेळावा यासाठी Turning point ठरला. या मेळाव्यात विविध शाखांमध्ये काम करणारे माजी विद्यार्थी त्या त्या शाखेचे गट करून भेटले आणि एकत्र येऊन विशेष असं काही करता येईल का याचा विचार झाला. त्यानुसार वैद्यकीय शाखेतले ३०-४० जण भेटले. बरीच चर्चा झाली. रुग्णालय सुरू करावं ही कल्पना त्यांतल्या बऱ्याच जणांना पटली. त्यातही १०-१२ डॉक्टर्स परत परत भेटले. एकत्र काम करायचं असं ठरलं आणि मेडिकल ट्रस्ट स्थापन करण्यासाठी गिरीशरावांची परवानगी मागितली. गिरीशरावांनी आधी काही अटी घातल्या. त्या अटी पूर्ण केल्या तरच ट्रस्ट स्थापन करता येईल, असं त्यांनी सांगितलं. पहिलं म्हणजे या गटातल्या सदस्यांनी दर पंधरा दिवसांतून किमान एकदा तरी एकत्र भेटलं पहिजे. जर सलग एक वर्ष हे एकत्र जमू शकले तर त्यांना विश्वास वाटेल की हे सर्व एकत्र कामही करू शकतात. दुसरं म्हणजे कुठलीही ठोस कृती करण्यापूर्वी या गटानं भारतातली काही प्रतिथयश आणि ध्येयवादी रुग्णालयं बघावी.

या अटींप्रमाणे दर आठवड्याला या गटातले कमीत कमी दोन सदस्य तरी भेटू लागले. बाकी इतर कामानिमित्त इकडे तिकडे असले तरीही संपर्कात होते. दुसऱ्या अटीप्रमाणे विविध रुग्णालयांचे दौरे सुरू झाले. या दौऱ्यांमुळे खरोखर या 'टीम'च्या अनुभवांत आणि विचारांत फार महत्त्वाची भर पडली. इतर ध्येयवादी संस्था आणि लोकांनी चालविलेली रुग्णालयं कशी आहेत ? आपण असं काही करू शकू का ? रुग्णालय उभारलं तर ते कसं असावं याची रूपरेषा मनात स्पष्ट होऊ लागली. अनुभवी, तज्ज्ञ आणि सुजाण लोकांनी आयुष्यभर उपयोगी पडतील असे मोलाचे सल्ले दिले.

लातूरच्या विवेकानंद रुग्णालयाच्या डॉ. अशोकराव कुकडे यांनी सांगितलं, की 'तुम्ही पुण्यात आहात, प्रबोधिनी तुमच्या पाठीशी आहे. आम्हांला मराठवाड्यात आल्या तशा अडचणी तुम्हांला येणार नाहीत. पण एक मात्र लक्षात ठेवा, सुरुवातीच्या काळात आपल्याला पैसा हा फार महत्त्वाचा प्रश्न वाटतो. काही काळानं हा प्रश्न सुटतोच. या कामासाठी पैसे कधीही कमी पडत नाहीत. पण चांगल्या माणसांचा तुटवडा कायमच जाणवत राहातो; त्यामुळे चांगली माणसं जोडा आणि त्यालाच महत्त्वाची 'ॲसेट' समजा.'

कर्नाटकात घटप्रभेला जाऊन डॉ. माधवराव वैद्यांना भेटले. त्यांना भेटून, त्यांचे विचार, ज्ञान आणि रुग्णालय बघून सगळे भारावून गेले. बऱ्याच शंका विचारल्या. 'आम्ही जर आमची स्वत:ची प्रॅक्टिस प्रामाणिकपणे केली तर तीच देशसेवा नाही का ? असं संस्थेसाठी कामच कशासाठी करावं ?' असं विचारल्यावर माधवराव म्हणाले, की 'जर माझ्याजवळ १०० किलोवॅट क्षमतेचा जनरेटर असेल आणि मला त्याच्या फक्त १० किलोवॅटची गरज असेल तर बाकीची वीज वाया घालवावी हे मला पटत नाही. मी त्या जनरेटरची पूर्ण क्षमता वापरीन. माझी गरज मी भागवीनच पण त्यानंतर उरलेल्या ९० किलोवॅटचा जर समाजाला काही उपयोग होत असेल तर तो मी आनंदानं करीन. तुमचं मात्र काय ते तुम्हीच ठरवा'.

'खेड्यात रुग्णालयं कमी आहेत आणि तिथं प्रामाणिकपणे काम करणंही शक्य आहे. पुण्यात वैद्यकीय क्षेत्रात अप्रामाणिकता पाय रोवून बसली आहे; त्यामुळे खेड्यातच रुग्णालय काढणं योग्य ठरेल का ?' असं विचारल्यावर डॉ. वैद्यांनी विनोबा भावेंचं एक वाक्य सांगितलं, 'Greater the darkness, brighter is the glow of a matchstick. जर तुम्हांला असं वाटतं की शहरात अप्रामाणिकपणा फार वाढला आहे तर तुमचा एक लहानसा प्रामाणिक प्रयत्नसुद्धा उठून दिसेल.' ' देशासाठी आम्ही काय करावं', असं विचारल्यावर ते म्हणाले, की 'ते मी सांगू शकत नाही. माझा भारत देश या रुग्णालयाच्या कुंपणाच्या आतच संपतो. मला जे आणि जेवढं काही शक्य आहे ते सगळं इथंच मनापासून करायचा प्रयत्न करतो.' घटप्रभेचं रुग्णालय आणि माधवरावांच्या भेटीचा प्रभाव सगळ्यांच्या मनावर आयुष्यभर राहील.

त्यानंतर बाबा आमटे, डॉ. प्रकाश आमटे, डॉ. अभय बंग यांच्या रुग्णालयांना भेटी दिल्या. त्यांच्याबरोबर काम करून प्रत्यक्ष अनुभव घेतला. प्रत्येक भेटीनंतर अनुभवकथन, गिरीशरावांशी चर्चा असायची. जवळ जवळ एक वर्ष पूर्वतयारीत गेलं. तयारी इतक्या टोकाची होती की सचिन गांधी, जो बिचारा एकटाच अविवाहित होता, त्याचं लग्न कुठल्या शाखेतल्या डॉक्टर मुलीशी केलं तर रुग्णालयाला उपयोगी पडेल, हे पण इतरच ठरवू लागले. सुदैवानं सचिननं कुणाचं ऐकलं नाही! वर्षभर हे सात ते आठ जण भेटत होते. रुग्णालयाची रूपरेषा ठरवीत होते.

दि. ७ एप्रिल १९९३ रोजी ज्ञान प्रबोधिनी मेडिकल ट्रस्ट रजिस्टर झाला. गिरीशराव, वामनराव, भाई फडके, धनंजय केळकर, मिलिंद मोडक, गिरीश गोडबोले आणि सचिन गांधी हे विश्वस्त झाले.

नवीन रुग्णालय बांधण्यासाठी पैसे नव्हते म्हणून एखादं जुनं, न चालणारं रुग्णालय भाड्यानं चालवायला घ्यावं असं ठरलं. अशा रुग्णालयाचा शोध आणि रुग्णालय चालविण्यासाठी लागणारा निधी उभारण्याचा प्रयत्न सुरू झाला. कोथरूड ते कॅम्पपर्यंत सर्व न चालणाऱ्या रुग्णालयांचा विचार झाला. प्रत्येक ठिकाणी तिथल्या व्यवस्थापनाशी त्यांच्या अटी, भाडं इत्यादी विषयांवर सविस्तर चर्चा व्हायची. पण पुढे काही सरकत नव्हतं.

डॉ. धनंजय केळकर आणि डॉ. मिलिंद मोडक हे त्यांतल्या त्यात सिनियर होते आणि पुण्यातल्या बऱ्याच रुग्णालयांत जायचे. प्रबोधिनीत 'ज्ञान प्रबोधिनी मेडिकल ट्रस्टला' त्यांचं ऑफिस म्हणून एक खोली देण्यात आली. तिथं दोन पाट्या होत्या. त्यांतल्या एका पाटीवर आज किती पैसे गोळा झाले त्याची नोंद असायची. बऱ्याच वेळा तिथं लिहिण्यासारखं काहीच नसायचं. दुसऱ्या पाटीवर किती रुग्णालयं बघितली त्यांची यादी होती.

धनंजय आणि सचिन लोकांकडून हजार-हजार रुपये देणगी गोळा करीत होते. कै. वहीकर वकील प्रबोधिनीचे धडाडीचे कार्यकर्ते होते. या कामात त्यांनी बरीच मदत केली. वहीकर आणि धनंजय सकाळी लवकर मंडईत जायचे. मंडईतल्या प्रत्येक गाळ्यासमोर धनंजयला उभं करून वहीकर प्रबोधिनी, मेडिकल ट्रस्ट आणि रुग्णालयाबद्दल सांगायचे. या कुठल्याही गोष्टीशी संबंध नसलेला व्यापारी फक्त वहीकरांना टाळता येणार नाही म्हणून कधी पाचशे तर कधी हजार रुपयांची देणगी द्यायचा.

अशा प्रकारे ज्यांचा बहुतेक भविष्यात सुरू होणाऱ्या या रुग्णालयाशी कधी संबंधसुद्धा येणार नाही, त्या लोकांकडून ७५,०००/- रुपये गोळा झाले. त्या काळात सगळ्यात पहिली मोठी देणगी अकरा हजार एक रुपयांची होती आणि तीही वहीकरांच्या ओळखीमुळे पूना हॉस्पिटलचे विश्वस्त श्री. देवीचंद जैन यांनी दिली होती. त्यांनी धनंजयला सांगितलं की मी फक्त नववी शिकलो आहे, तरी माझं रुग्णालय चांगलं चालतं. तू तर एवढा शिकला आहेस; तुझं रुग्णालय फारच चांगलं चालेल. बऱ्याच लोकांनी फक्त सल्ले दिले. असे तर बरेच भेटले, ज्यांनी ठामपणे सांगितलं की पूर्वी पण काही डॉक्टरांच्या ग्रुपने असे प्रयोग केले होते पण ते फसले. असं सांगणारेपण भेटले की मराठी माणसाला अशी उंच उडी झेपत नाही. तुमचं स्वत:चं जे काही चाललं आहे तेच बरं आहे. असला काहीतरी प्रयत्न करू नका; तोंडघशी पडाल आणि हसं करून घ्याल. एकानं धनंजयला विचारलं की, 'तुम्हांला पैसे कशासाठी देऊ ? तुम्ही काय स्वत:ला रॉबिनहुड समजता, की माझ्याकडून पैसे घेऊन गरिबांमध्ये वाटाल ?'

दुसरीकडे कमलताई नातूंसारखी माणसंपण भेटली. प्रत्यक्षात रुग्णालयही ताब्यात नसताना, कुठलाही अनुभव नसताना, फक्त विश्वासाच्या आधारावर कमलताईंनी एक लाख रुपयांची देणगी दिली. कमलताईंशी तेव्हा जे ऋणानुबंध जुळले ते शेवटपर्यंत राहिले. त्यांच्यासारख्या लोकांमुळेच उत्साह टिकून राहिला. असेच काही महिन्यांत साधारण आठ लाख रुपये गोळा झाले.

धोंडूमामा साठे होमिओपॅथी कॉलेजचं संजीवन रुग्णालय चालवायला द्यायचं आहे, असं कळलं आणि त्याच्यासाठी प्रयत्न सुरू झाले. एक 'प्रपोजल' तयार करून MTES सोसायटीला देण्यात आलं आणि सगळे असं समजू लागले की आता हॉस्पिटल आपल्याला मिळालंच. नंतर कळलं की संजीवनसाठी इतर बऱ्याच

मोठ्या वैद्यकीय संस्थांनीपण प्रपोजल दिलं होतं. सगळ्यांना फार आश्चर्य वाटलं. तेव्हाच धनंजयनं एक वाक्य कुठंतरी ऐकलं की 'दुर्बळ दुर्बळांना आधार देऊ शकत नाही'. याचा अर्थ त्यांनी असा काढला की एक न चालणारं हॉस्पिटल अनुभव नसलेली माणसं चालवू शकणार नाहीत. त्यामुळे आपण किती सक्षम आहोत हे दाखविण्यासाठी धनंजय आणि मिलिंदनं एक पत्र तयार करून सोसायटीला दिलं. त्यात लिहिलं होतं की आमची एक 'young and dynamic team' आहे. आणि आमची आधीच कशी चांगली प्रॅक्टिस आहे हे दाखविण्यासाठी आपलं मासिक उत्पन्न त्यात लिहिलं होतं. आता हे सगळं फार विनोदी आणि हास्यास्पद वाटलं तरी तेव्हा तेच योग्य वाटायचं. शिवाय पाच लाख रुपये डिपॉझिट म्हणून सोसायटीला दिले. इतर सर्व प्रपोजल्सपेक्षा यांच्या प्रपोजलचं वेगळेपण हे होतं की इतर सर्व गोष्टींबरोबर हे सर्व कामगारांची जबाबदारी पण घ्यायला तयार होते.

जवळजवळ महिन्यानंतर MTES सोसायटीनं ज्ञान प्रबोधिनी मेडिकल ट्रस्टला रुग्णालय चालवायला देण्याचं ठरविलं. दि. १ नोव्हेंबर १९९३ ला संजीवन रुग्णालय ज्ञान प्रबोधिनी मेडिकल ट्रस्टच्या ताब्यात आलं. उपासना करून कामाला सुरुवात केली. रुग्णालयाची परिस्थिती अतिशय खराब होती. संध्याकाळी रुग्णालयात कुत्री येऊन बसायची. रिसेप्शन किंवा मुख्य द्वारावर वॉचमन असावा, अशी काही व्यवस्था नव्हतीच. पहिल्या मजल्यावर एक-दोन पेशंट असले तर असायचे. बऱ्याच भागात दिव्यांची गरजच कुणाला भासली नव्हती; त्यामुळे संध्याकाळनंतर पूर्ण अंधार असायचा. समोरच्या झोपडपट्टीतील लोक कॉटपासून ब्लँकेटपर्यंत जे लागेल ते सरळ हॉस्पिटलमधून उचलून न्यायचे. तेव्हा डॉ. केळकरांनी निर्णय घेतला की जर हे हॉस्पिटल चालवायचं असेल तर कॅम्पस्‌वर २४ तास राहणं आवश्यक आहे. डॉ. केळकर आणि डॉ. गोडबोले सहकुटुंब संजीवनमध्ये राहायला आले.

संजीवन रुग्णालय कुठे आहे हेपण पुण्यात बऱ्याच जणांना माहीत नव्हतं. गरवारे कॉलेजजवळ जिथं बैलांना नाल ठोकतात त्याच्यासमोर संजीवन आहे, अशी संजीवनची खूण लोक सांगायचे. जवळपासच्या शंभर घरांमध्ये रुग्णालयाबद्दल एक सर्व्हे करण्यात आला. त्यांतल्या सत्तर टक्के लोकांनी सांगितलं की इथं ॲलोपथी रुग्णालयसुद्धा आहे, हे त्यांना माहीतच नाही.

ओपीडीत एक पाटी होती. त्यावर लिहिलं होतं. 'आज हे कन्सल्टंट येणार नाहीत'. ती पाटी आधी काढली. रुग्णालय स्वच्छ केलं. रिसेप्शन खराट्यानं घासून धुतलं, तेव्हा तिथं पांढरा संगमरवर आहे हे कळलं. तिथले कामगार फारच साशंक असल्यामुळे मदतीला पुढे येत नव्हते. सोसायटीनं एक नवी इमारत बांधली होती, जी बंदच होती, पण बांधकामाचा कचरा, राडारोडा तिथंच पडला होता. एके दिवशी आम्हीच कुंचे, फावडी, पाटी घेऊन स्वच्छता करायला सुरुवात केली. दोन्हीकडे रुग्णालयाचे कर्मचारी हात बांधून तमाशा बघायला उभे होते. न राहून त्यांना विचारलं की 'तुम्ही आम्हांला मदत करायला का येत नाही ?' त्यावर एका मामानं दिलेलं उत्तर त्यांच्या त्या वेळच्या मनोवृत्तीचं प्रतिबिंबच होतं. तो म्हणाला, ''एकदा काम केलं तर तुम्ही सारखंच काम सांगाल'' ! सगळी कामं आम्हीच करायचा प्रयत्न करत होतो. रिसेप्शनवर कधी मी, कधी भाई तर कधी गिरीश गोडबोले असायचे. रात्रीचा टेक्निशियन नसल्यामुळे रात्री पेशंट आला तर गिरीशच एक्स-रे काढायचे. रात्री कधीही रिक्षाचा आवाज झाला की धनंजय पेशंट आला म्हणून धावत-पळत खाली जायचे. कारण रात्री

रिसेप्शनवर कोणीच नसायचं. धनंजयनं बाहेर शस्त्रक्रिया करणं पूर्णपणे बंद केलं. त्यांच्या सर्व रुग्णांची ते संजीवनमध्येच शस्त्रक्रिया करू लागले. ओपीडीची परिस्थिती सुधारली. चोवीस तास रिसेप्शन आणि सिक्युरिटी ठेवली. रात्री दिवे गेले की आम्हीच मेणबत्त्या घेऊन एका-एका खोलीत लावायचो. भाई फडके चांगल्या माणसांच्या शोधात असायचे. बरीच मेडिकल आणि नॉन-मेडिकल माणसं त्यांनीच आणली. काम वाढत होतं. रुग्णालयाचे कर्मचारी द्विधा मन:स्थितीत होते. काही काम करायचे; काही नुसता त्रास द्यायचे. कर्नल हसबनीसांचा रुग्णालयाशी संबंध आल्यावर त्यांनी ठरविलं की तुम्हांला एक चांगला आणि कडक ॲडमिनिस्ट्रेटर पाहिजे. त्यांनी कर्नल पेंडसे यांच्याशी संपर्क साधला. कर्नलसाहेब तेव्हा बजाजमध्ये लठ्ठ पगारावर कामाला होते. धनंजय आणि मिलिंदनं घाबरत घाबरत त्यांना सांगितलं की आम्ही तुम्हाला फार पगार देऊ शकणार नाही. पण पगाराची काळजी न करता कर्नलसाहेब रुग्णालयातच प्रशासक म्हणून रुजू झाले.

वैद्यकीय क्षेत्रातली माहिती बऱ्यापैकी असली तरीही भांडवली व्यवहारात बहुतेक सगळ्यांचं ज्ञान 'मायनस'मध्ये होतं, असं म्हणायला हरकत नाही. करंट अकाऊंट नावाचं एक खातं असतं हेसुद्धा तेव्हा पहिल्यांदा कळलं. श्री.बाबुलालजी बियाणी यांनी रुग्णालयाचे सगळे वित्तीय व्यवहार तपासून धनंजयला income-expenditure चा हिशेब समजावून सांगितला. त्यांच्या मते अशा पद्धतीनं रुग्णालय सहा महिन्यांपेक्षा जास्त काळ चालवणं शक्य नव्हतं. पण त्यामुळे अजून निर्धारानं कामाला सुरुवात झाली.

लहानमोठ्या बऱ्याच गोष्टी अनुभवानं शिकत गेलो. कधी-कधी काहीतरी कसं करायचं हे माहीत नसल्यामुळे आपली एक वेगळीच पद्धतसुद्धा तयार झाली. डॉ. विनायक देसूरकरपण संजीवनमध्ये राहायला आले आणि संजीवनमध्ये बंद पडलेली बरीच यंत्रं त्यांनी परत चालू केली. संजीवन चालवायला घेण्यापूर्वीची दर आठवड्याला भेटण्याची प्रथा चालू राहिली. या ग्रुपला आता 'कोअर ग्रुप' असं नाव मिळालं. दर बुधवारी रात्रीची ही मीटिंग बरीच वर्षं चालू होती. हळू-हळू या ग्रुपनं तज्ज्ञांना बोलावून व्यवस्थापनाचे धडे घ्यायला सुरुवात केली. सगळ्यांनी सगळं करण्यापेक्षा जबाबदाऱ्या वाटून घेतल्या. रुग्णालयात दोन लेबर युनियन होत्या. त्यांची भांडणं सतत चालू असायची. दाराबाहेर मांडव घालून कधीतरी काही कामगार संपावर असायचे. कधी काळ्या पट्ट्या लावून कामावर यायचे. तेव्हा कर्वे रोडच्या रेल्वे बुकिंग ऑफिसजवळ माणसं बसलेली असायची; ती रोजगारावर कामाला यायची. बऱ्याच वेळा त्यांना स्वच्छता करायला बोलावून आणावं लागायचं. तेव्हाच कधीतरी शोध लागला की पुण्यात अशा संस्था आहेत ज्या कॉन्ट्रॅक्टने कामगार पुरवतात; त्यामुळे बऱ्याच अडचणी कमी झाल्या. शिरीष जोशींनी कामगार युनियनचं 'इलेक्शन' घडवून आणलं. विजयी युनियनच संजीवनमध्ये राहिली; त्यामुळे आपसांतली भांडणं कमी झाली आणि कामगारांचा पण मॅनेजमेंटवरचा विश्वास वाढला. डॉक्टरांच्या २४ तास कॅम्पस्‌वर राहण्यानं आणि कुठलंही काम करायची तयारी असण्याचा त्यांच्यावर प्रभाव पडला.

रुग्णालय सुरू करून सहा महिने झाले. बराच आत्मविश्वास वाटू लागला. कामही वाढत होतं पण तरीही पुण्यात फार कमी लोकांना या रुग्णालयाबद्दल माहिती होती. लोकांना रुग्णालयाबद्दल आणि झालेल्या बदलांबद्दल कळावं म्हणून एक औपचारिक उद्‌घाटन करायचं ठरलं. श्री. अटलबिहारी वाजपेयी तेव्हा विरोधी पक्षनेते होते. त्यांनी या कार्यक्रमाला येण्यास संमती दिली. १ ऑगस्ट १९९४ ला संजीवन रुग्णालयाचं श्री.

वाजपेयींच्या हस्ते उद्घाटन झालं. उद्घाटनानंतर सभा झाली. ज्ञान प्रबोधिनी शाळेचे विद्यार्थी मदतीला आले. त्या दिवशी धो-धो पाऊस पडूनही कार्यक्रम ठरल्याप्रमाणे अगदी व्यवस्थित आणि नेटका झाला. श्री. वाजपेयींचं भाषण अतिशय उत्कृष्ट होतं, ज्याची दखल पुण्यातील सर्व वृत्तपत्रांनी घेतली. यानंतर लोक संजीवनला ओळखू लागले. रामकृष्ण मठानं संजीवन रुग्णालयाला विवेकानंदांचा एक पुतळा भेट दिला. हा पुतळा संजीवनच्या आवारात प्रवेश केल्यावर सर्वप्रथम दृष्टीस पडतो. हा पुतळाही रुग्णालयाचा एक महत्त्वाचा भाग झाला.

यानंतर एक महत्त्वाची घटना घडली. त्या वेळी पुणे विद्यापीठाचे कुलगुरू असलेले श्री. वसंतराव गोवारीकर आजारी पडून संजीवनमध्ये दाखल झाले. इतर प्रसिद्ध, प्रतिष्ठित रुग्णालयांच्या मानानं संजीवन तेव्हा अगदीच लहान, अप्रसिद्ध होतं. पण ज्ञान प्रबोधिनीशी गोवारीकरांचा घनिष्ठ संबंध होता व सौ. सुधाताई गोवारीकरांचा संजीवनमधील डॉक्टर्सवर पूर्ण विश्वास होता; त्यामुळे श्री. वसंतरावांना कुठेही न हलवण्यावर सुधाताई ठाम होत्या. यथावकाश गोवारीकर बरे होऊन घरी गेले. मात्र, रुग्णालयातील त्यांच्या या वास्तव्यात त्यांना भेटण्यासाठी येणाऱ्या प्रतिष्ठित व्यक्तींमुळे संजीवनच्या विषयी उत्सुकता वाढू लागली. संजीवनची माहिती अनेकांपर्यंत पोचू लागली. सगळ्यांचा आत्मविश्वास खूप वाढला. नावाबरोबर देणगीदार वाढू लागले. नवीन NICU आणि मोठं ICU कार्यरत झालं. बरेच नवीन उपक्रमही सुरू झाले. त्यांतील शिरवळमधील कमला मेहता नेत्र रुग्णालयानं तर आता चांगलंच बाळसं धरलं आहे. श्री. मफतलाल मेहता उर्फ काकाजी यांच्या मदतीचा याला मोठा हातभार लागला.

ज्ञान प्रबोधिनी मेडिकल ट्रस्टनं आता चांगलाच आकार घेतला. यानंतर संजीवन ते दीनानाथ मंगेशकर रुग्णालय हा प्रवास फारच वेगानं झाला. या दरम्यान एन्रॉनच्या दाभोळ प्रकल्पातल्या वैद्यकीय कार्याचा अनुभवही जमा झाला. संजीवन आणि दीनानाथ मंगेशकर रुग्णालय ही ट्रस्टद्वारा चालवली जाणारी उत्तम रुग्णालयं गणली जातात. हॉस्पिटल चालविण्याचा काहीही अनुभव व जवळ पैसा नसतानाही केवळ इच्छाशक्ती व कष्टांच्या जोरावर काही ध्येयवेड्या तरुणांनी आधी संजीवन रुग्णालयाला नवसंजीवन दिलं व या अनुभवाच्या शिदोरीवर दीनानाथ मंगेशकर रुग्णालयासारखं भव्य-दिव्य रुग्णालयही ते यशस्वी रीत्या चालवीत आहेत !

(श्रीमती स्वाती केळकर : ज्ञान प्रबोधिनी आयुर्विज्ञान न्यासाचे वैद्यकीय संचालक डॉ. धनंजय केळकर यांच्या सुविद्य पत्नी.)

★ ★ ★